| १३०) | सुनिल दौलत अंभोरे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| १३१) | बाबासाहेब भाऊराव भारसाखळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| १३२) | छगन तुळजाराम सलामपूरे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| १३३) | सुभाष बाबुलाल हरणे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| १३४) | बबन पंडीतराव जाधव | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| १३५) | राधाकिसन फकीरचंद बकले | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.४२४/- |
| १३६) | वाजीद खान मन्सूर खान | दै.वे.सेवक | वाचनालय | रु.४२४/- |
| १३७) | इम्रान उल्ल खान फ़ैज उल्ला | दै.वे.सेवक | वाचनालय | रु.४२४/- |
| १३८) | फ़ारुख अली तुराब अली | दै.वे.सेवक | वाचनालय | रु.४२४/- |
| १३९) | एहतेशाम अली हाश्मी | दै.वे.सेवक | वाचनालय | रु.४२४/- |
| १४०) | मिर्झा रुफ़द बेग | दै.वे.सेवक | वाचनालय | रु.४२४/- |
| १४१) | सुरेश धाबर्डे | दै.वे.सेवक | नगर सचिव विभाग (मा.सभापती, स्था.स.) | रु.४२४/- |
| १४२) | वनमाला कचरुजी वाघमारे | दै.वे.सेविका | वाचनालय | रु.४२४/- |
| १४३) | रमादेवी भगवान म्हस्के | दै.वे.सेविका | प्रभाग क्र.६ | रु.४२४/- |

अनुक्रमांक 143 वरील श्रीमती रमादेवी भगवान म्हस्के,दै.वे.सेविका ह्या दि.24/03/2017 पासून गैरहजर असल्याने त्यांचा गैरहजर कालावधी गैरहजर ठेवून अंतिम संधी म्हणून मुदतवाढ देणे व यानंतर त्या गैरहजर राहील्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. व त्यांना कामावर हजर करून आदेश निर्गमित झालेच्या तारखेपासून पुढील मुदतवाढ देणे योग्य.

करिता वरील एकुण (143) दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.03/05/2017 ते 31/10/2017 पर्यंत 06 (सहा) महिन्याची मुदतवाढ देण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्र.53 व 54 दैनिक वेतन कर्मचाऱ्यांच्या संदर्भात स.सदस्यांनी सभागृहात केलेल्या चर्चेनुसार लेखा विभाग व आस्थापना विभाग यांनी आपसामध्ये ताळमेळ राखावा. या कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर कसे होईल, याची दक्षता घ्यावी. पुढील मुदतवाढीचा प्रस्ताव सप्टेंबर महिन्यातच येणे आवश्यक आहे. वर्ग-4 च्या प्रस्तावामध्ये श्री.संदीप सुभाष घाग, दैनिक वेतन सेवक, शिक्षण विभाग, मनपा यांचे नांव वगळण्यात आलेले आहे, त्यांनी अर्ज देऊन मुदतवाढ मिळावी म्हणुन विनंती केलेली आहे. त्यांच्या पत्नीचे अपघातामध्ये दोन्ही पाय गेल्यामुळे ते कार्यालयात हजर राहु शकले नाही किंवा कार्यालयास माहिती देऊ शकले नाही. त्यांनी माफीनामा लिहुन दिलेला आहे. त्यांच्या नावाचा वर्ग-4 च्या प्रस्तावामध्ये समावेश करून विषय क्र.53 व 54 मंजूर करण्यांत येत आहे. स.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार या कर्मचाऱ्यांच्या नावाचा आकृतीबंधामध्ये समावेश करण्यासाठी प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी. तसेच वर्ग-3 व वर्ग-4 च्या काही कर्मचाऱ्यांबाबत माझ्याकडे तक्रारी आलेल्या आहे, त्यांना यावेळेस मुदतवाढ देण्यांत येते, परंतु यापूढे पुन्हा तक्रारी प्राप्त झाल्यास त्यांचेवर कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात येईल, याची प्रशासनानेही दखल घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-4 संवर्गातील अ.क्र.01 ते 143 (एकुण 143 कर्मचारी) कर्मचाऱ्यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.03/05/2017 ते 31/10/2017 पर्यंत 06 (सहा) महिन्याची मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यांत येते. तसेच अनुक्रमांक 143 वरील श्रीमती रमादेवी भगवान म्हस्के,दै.वे.सेविका ह्या दि.24/03/2017 पासून गैरहजर असल्याने त्यांचा गैरहजर कालावधी गैरहजर ठेवून अंतिम संधी म्हणून मुदतवाढ देणे व यानंतर त्या गैरहजर राहील्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल व त्यांना कामावर हजर करून आदेश निर्गमित झालेच्या तारखेपासून पुढील मुदतवाढ देणेस आणि वर्ग-4 च्या प्रस्तावामध्ये श्री.संदीप सुभाष घाग, दैनिक वेतन सेवक, शिक्षण विभाग, मनपा यांचे नांव वगळण्यात आलेले आहे, त्यांनी अर्ज देऊन मुदतवाढ मिळावी म्हणुन विनंती केलेली असल्याने व त्यांच्या पत्नीचे अपघातामध्ये दोन्ही पाय गेल्यामुळे ते कार्यालयात हजर राहु शकले नसल्याने किंवा कार्यालयास माहिती देऊ शकले नाही, याबाबत त्यांनी माफीनामा लिहुन दिलेला असुन त्यांच्या नावाचा वर्ग-4 च्या प्रस्तावामध्ये समावेश करणेसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 55 :**

विषय : 20 टन क्षमतेच एस्कॅवेटर एल.सी. (पोकलेन) मशिन (1 नग) पुरवठा करणे या कामासाठी मे.टोटल अर्थमुव्हरर्स प्रा.लि., नवी मुंबई यांची कमी दराची म्हणजेच रूपये 44,50,200/- रकमेची निविदा स्विकृत करण्यास व करार करण्यास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : महाटेंडर्स आय.डी.क्र.-2016-AMCA-162224-2

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता - (वार्ड 1,2,3 व 8) |
| 2. | कामाचे स्वरुप | 20 टन क्षमतेचे एस्कॅवेटर एल.सी. (पोकलेन) मशिन (1 नग) पुरवठा करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत नारेगाव कचरा डेपो येथील कचरा हटवण्याच्या कामासाठी एस्कॅवेटर 200 |

| | | |
|---|---|---|
| | | (पोकलेन) मशिन खरेदी करणेसाठी एकुण रूपये 49,35,000/- रकमेचे पुर्वगणनपत्र मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आले. या पुर्वगणनपत्रकास मा.स्थायी समिती ठराव क्र.33 दिनांक 27/09/2016 मान्यता प्राप्त आहे. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | मंजुर पुर्वगणनपत्रकाप्रमाणे रूपये 49,35,000/- रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले आहे. |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | (www.mahatenders.gov.in)<br>प्रसिध्दीचा दिनांक 30/12/2016 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 10/01/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 21/03/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 02 |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा कमी/जास्त | |
|---|---|---|---|---|
| 1 | मे.टोटल अर्थमुव्हरर्स प्रा.लि., नवी मुंबई | 44,50,200/- | 4,84,800/- कमी | 10.89 % कमी |
| 2 | मे.रत्नप्रभा मोटर्स, औरंगाबाद | 46,78,153/- | 2,56,847/- कमी | 5.49 % कमी |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | खाजगी तत्वावर कचरा उचलणे व साफसफाई वाहतुक खर्च (सांकेतांक 34125500000) |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही. |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |

तरी विषयांकित काम ठेकेदार मे.टोटल अर्थमुव्हरर्स प्रा.लि., नवी मुंबई यांचेकडून निविदा रक्कम रूपये 49,35,000/- पेक्षा रूपये 4,84,800/- ने कमी म्हणजेच रक्कम रूपये 44,50,200/- मध्ये करण्यास व 1 जुलै 2017 पासून लागु होणाऱ्या GST मुळे होणाऱ्या वाढीव खर्चासह आणि करार करण्यास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, 20 टन क्षमतेच एस्कॅवेटर एल.सी. (पोकलेन) मशिन (1 नग) पुरवठा करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.89 % कमी दराचे निविदाधारक मे.टोटल अर्थमुव्हरर्स प्रा.लि., नवी मुंबई यांचेकडून निविदा रक्कम रूपये 49,35,000/- पेक्षा रूपये 4,84,800/- ने कमी म्हणजेच रक्कम रूपये 44,50,200/- मध्ये करण्यास व 1 जुलै 2017 पासून लागु होणाऱ्या GST मुळे होणाऱ्या वाढीव खर्चासह आणि करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 56 : (कर्मचाऱ्याचे अपील)**

श्री.गणेश निवृत्ती भुजबळ, कनिष्ठ लिपीक, महानगरपालिका औरंगाबाद यांना कनिष्ठ लिपीक पदावरून शिपाई या पदावर कार्यालयीन आदेश, जा.क्र./मनपा/आस्था-1/2017/426, दिनांक 03/04/2017 अन्वये पदावनत केल्याच्या आदेशाविरूध्द त्यांनी स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपिलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

सौ.किर्ती शिंदे : विषय क्र.56,57 व 58 यामध्ये असे दिसून येते की, संबंधीत कर्मचाऱ्यांना कनिष्ठ लिपीक या पदावरून शिपाई या पदावर आणण्यात आलेले आहे. हा जरी प्रशासकीय विषय असला तरी हे कर्मचारी मागील 10 ते 15 वर्षापासून आवक जावक व लिखीत स्वरूपाचे कामे करीत आहे. त्यांना अचानक संगणकावर काम करण्याचे सांगितले, त्यामुळे त्यांना ते काम जमले नाही. दैनंदिन कामकाजात संगणकाशी त्यांचा कुठलाही संबंध आला नाही. तरी त्यांना पुन्हा कनिष्ठ लिपीक पदावर आदेश देण्यांत यावे, त्यांच्यावर अन्याय झालेला आहे.

मा.सभापती : विषय क्र.56,57 व 58 अपीलावर प्रशासनाने खुलासा करावा.

आस्थापना अधिकारी-1 : महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सन 2005 मध्ये इ.मा.व. संवर्गातून नियुक्त केलेल्या 06 कर्मचाऱ्यांची दि.14/02/2017 रोजी मराठी व इंग्रजी टंकलेखनाची चाचणी परिक्षा घेण्यात आली असता, यापैकी 03 कर्मचारी श्री.शिवाजी तुकाराम ढोके, श्री.गणेश निवृत्ती भुजबळ, श्री.संतोष यशवंत गोरे यांना टंकलेखन करता आले नाही. त्यामुळे त्यांना कनिष्ठ लिपीक या पदावरून शिपाई या पदावर पदावन्नत करण्यात आले. या कार्यवाहीच्या अनुषंगाने संबंधीत कर्मचाऱ्यांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केलेली आहे, प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

मा.सभापती : हि शिक्षा किरकोळ स्वरूपाची आहे की, जबर स्वरूपाची?

आस्थापना अधिकारी-1 :शिक्षा तर जबर स्वरूपाची आहे,परंतु ते याच्या विरोधात मा.न्यायालयात गेलेले आहे.

मा.सभापती : संबंधीत कर्मचाऱ्यांनी अपील दाखल केलेले आहे, ते जरी मा.न्यायालयात गेलेले असतील, पण ते आपले कर्मचारी आहे. त्यांना अपील दाखल करण्याचा पुर्णपणे अधिकार आहे.

सौ.किर्ती शिंदे : त्यांना पुन्हा कनिष्ठ लिपीक पदावर घेण्यात यावे, हा अन्याय आहे.

मा.सभापती : महाराष्ट्र नागरी सेवा नियमाचे यामध्ये पालन झाले आहे का?

आस्थापना अधिकारी-1 : नियमावलीत असे काही नाही, परंतु त्यांची जी नियुक्ती झाली होती, दोन्ही टायपींगची अट होती.

मा.सभापती : महाराष्ट्र नागरी सेवा नियमामध्ये काय तरतुद आहे, विधी सल्लागार यांनी खुलासा करावा, ही शिक्षा किरकोळ आहे की, जबर स्वरूपाची यामध्ये महाराष्ट्र नागरी सेवा नियमाचे पालन झाले आहे का? महाराष्ट्र नागरी सेवा नियमामध्ये शिक्षा देण्याची तरतुद काय आहे, वाचून दाखवावी.

विधी सल्लागार : महाराष्ट्र नागरी सेवा आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 53 मध्ये जबर शिक्षा कारणे दाखवा नोटीस देऊन, खुलासा मागवून, डिपार्टमेंटल चौकशी झाल्यावरच देता येते.

मा.सभापती : विषय क्र.56, 57 व 58 नुसार श्री.गणेश निवृत्ती भुजबळ, कनिष्ठ लिपीक, श्री.शिवाजी तुकाराम ढोके, कनिष्ठ लिपीक व श्री.संतोष यशवंतराव गोरे, कनिष्ठ लिपीक यांनी स्थायी समितीकडे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या

कलम 56 (4) पोट कलम (1) च्या परंतुकाच्या खंड (ड) च्या तरतुदीच्या अधीन राहुन अपील सादर केलेले असल्यामुळे, व कलम 56 (3) नुसार या कर्मचाऱ्यांना खालच्या पदावर आणण्यासाठी कारण दाखविण्याची वाजवी संधी न दिल्यामुळे, त्यांना खालच्या पदावर आणण्याची देण्यांत आलेली शिक्षा ही जबर स्वरूपाची शिक्षा आहे. त्यांची मुळ नियुक्तीच कनिष्ठ लिपीक म्हणुन झालेली आहे, ते शिपाई पदावर नियुक्त नव्हतेच. त्यांना त्याहीपेक्षा खालच्या पदावर पदावनत करणे बाबत कुठल्याही नियमात तरतुद नाही, असे अपीलाचे अवलोकन केले असता, सभागृहाचे मत झाले आहे. संबंधीतास वाजवी संधी न देता सदर शिक्षा एकतर्फी लादण्यात आलेली असून ती शिक्षा नैसर्गिक न्यायतत्वाच्या विरूध्द आहे. भारतीय संविधानाच्या घटनेशी विसंगत आहे. तसेच जबर शिक्षा अंमलात आणण्याची विहीत पध्दती प्रशासनाने अवलंबविलेली दिसत नाही. सदरील कर्मचाऱ्यांपैकी दोघांचे वय 54 वर्षे आहे, दोघांची सेवानिवृत्ती 04 वर्षावर येऊन ठेपलेली आहे. संबंधीत कर्मचाऱ्यांना नैसर्गिक न्याय मिळाला नसल्याचे प्रशासनाच्या खुलाशावरून दिसून येते. सदर कर्मचाऱ्यांकडे टंकलेखनाचे प्रमाणपत्र, एमएससी-आयटी प्रमाणपत्र आहे. संबंधीत कर्मचाऱ्यांना आजपर्यंत टेबलवर्कची कामे / हस्तलिखीताची कामे देण्यांत आलेली होती. त्यामुळे त्यांना टंकलेखनाचा सराव राहिलेला नव्हता, पुरेसा अवधी न देता अचानक मा.आयुक्तांनी त्यांची परिक्षा घेतली व त्यात ते नापास झाल्यामुळे, त्यांना तात्काळ पदावनत करण्यांत आले, यामुळे सदर कर्मचाऱ्यांवर अन्याय झाल्याचे दिसून येते. सेवा निवृत्तीच्या उंबरठ्यावर असतांना त्यांच्यावर झालेला अन्याय योग्य नाही. या वस्तुस्थितीचा विचार करून स्थायी समिती असा आदेश देत आहे की,संबंधीत कर्मचाऱ्यांचे पदावनती संदर्भात काढण्यांत आलेले कार्यालयीन आदेश

01.जा.क्र./मनपा/आस्था-1/2017/425,दि.03/04/2017,

02.जा.क्र./मनपा/आस्था-1/2017/426,दि.03/04/2017,

03.जा.क्र./मनपा/आस्था-1/2017/427,दि.03/04/2017

रद्दबातल ठरविण्यात येत आहे, त्यांना पदावनत केल्याच्या तारखेपासून पुनश्चः कनिष्ठ लिपीक या पदावर पुर्ववत कायम करण्याचा निर्णय घेण्यात येतो. तसेच संबंधीत कनिष्ठ लिपीक यांना भविष्यात टंकलेखनाचे काम संगणकावर येणे आवश्यक आहे, त्यांनीही त्याचा सराव करून संगणकावर कामे करावी. स्थायी समिती समोर सदरील तिनही कर्मचाऱ्यांनी सादर केलेले अपील मंजूर करण्यांत येत आहे. प्रशासनाने स्थायी समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी ताबडतोब करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्री.गणेश निवृत्ती भुजबळ, कनिष्ठ लिपीक, महानगरपालिका औरंगाबाद यांना कनिष्ठ लिपीक पदावरून शिपाई या पदावर पदावनत केल्यासंबंधीचे कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-1/2017/426, दिनांक 03/04/2017 रद्द करण्यांत येत आहे. त्यांना पदावनत केल्याच्या तारखेपासून पुनश्चः कनिष्ठ लिपीक या पदावर पुर्ववत कायम करण्याचा निर्णय घेण्यात येतो. श्री.गणेश निवृत्ती भुजबळ, कनिष्ठ लिपीक, महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्थायी समिती समोर सादर केलेले अपील मंजूर करण्यांत येते. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. प्रशासनाने स्थायी समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी ताबडतोब करावी, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 57 : (कर्मचाऱ्याचे अपील)**

श्री.शिवाजी तुकाराम ढोके, कनिष्ठ लिपीक, महानगरपालिका औरंगाबाद यांना कनिष्ठ लिपीक पदावरून शिपाई या पदावर कार्यालयीन आदेश,जा.क्र./मनपा/आस्था-1/2017/425,दिनांक 03/04/2017 अन्वये पदावनत केल्याच्या आदेशाविरूध्द त्यांनी स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपिलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्री.शिवाजी तुकाराम ढोके, कनिष्ठ लिपीक, महानगरपालिका औरंगाबाद यांना कनिष्ठ लिपीक पदावरून शिपाई या पदावर पदावनत केल्यासंबंधीचे कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-1/2017/425, दिनांक 03/04/2017 रद्द करण्यांत येत आहे. त्यांना पदावनत केल्याच्या तारखेपासून पुनश्चः कनिष्ठ लिपीक या पदावर पुर्ववत कायम करण्याचा निर्णय घेण्यात येतो. श्री.शिवाजी तुकाराम ढोके, कनिष्ठ लिपीक, महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्थायी समिती समोर सादर केलेले अपील मंजूर करण्यांत येते. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. प्रशासनाने स्थायी समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी ताबडतोब करावी, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 58 : (कर्मचाऱ्याचे अपील)**

श्री.संतोष यशवंतराव गोरे, कनिष्ठ लिपीक, महानगरपालिका औरंगाबाद यांना कनिष्ठ लिपीक पदावरून शिपाई या पदावर कार्यालयीन आदेश,जा.क्र./मनपा/आस्था-1/2017/427,दिनांक 03/04/2017 अन्वये पदावनत केल्याच्या आदेशाविरूध्द त्यांनी स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपिलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्री.संतोष यशवंतराव गोरे, कनिष्ठ लिपीक, महानगरपालिका औरंगाबाद यांना कनिष्ठ लिपीक पदावरून शिपाई या पदावर पदावनत केल्यासंबंधीचे कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-1/2017/427, दिनांक 03/04/2017 रद्द करण्यांत येत आहे. त्यांना पदावनत केल्याच्या तारखेपासून पुनश्चः कनिष्ठ लिपीक या पदावर पुर्ववत कायम करण्याचा निर्णय घेण्यात येतो. श्री.संतोष यशवंतराव गोरे, कनिष्ठ लिपीक, महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्थायी समिती समोर सादर केलेले अपील मंजूर करण्यांत येते. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. प्रशासनाने स्थायी समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी ताबडतोब करावी, वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 59 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.82 अंतर्गत संतोषीमाता नगर येथील आरोग्य केंद्राजवळ आर.सी.सी. पुल बांधणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग सन 2015-16 च्या दरसुचीनुसार र.रू.44,99,686/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन या कामाचा खर्च सन 2017-18 च्या अर्थसंकल्पातील नाला ट्रेनिंग कामे या लेखाशिर्षक मधुन रक्कम रू.45 लक्ष मधुन प्रस्तावित करण्यात येईल.

करीता अंदाजपत्रक र.रू.44,99,686/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.82 अंतर्गत संतोषीमाता नगर येथील आरोग्य केंद्राजवळ आर.सी.सी. पुल बांधणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.44,99,686/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 60 :**

मा.अतिरिक्त आयुक्त यांचे मान्यतेने प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या नागरी क्रिडा केंद्र क्र.05, एन-2 कम्युनिटी सेंटर येथील 12x20 या आकाराचा हॉल व्यायामशाळा सुरू करण्यासाठी अध्यक्ष, न्यु पावर व्यायाम व क्रिडा असोसिएशन औरंगाबाद यांनी मागणी केलेली आहे. एन-2 कम्युनिटी सेंटर येथे दुरूस्तीचे काम चालू असल्याने पूर्ण दुरूस्ती होऊन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बराच कालावधी लागणार असल्याने दरम्यानच्या काळात महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून सद्यस्थितीत दुरूस्तीचे काम पूर्ण झालेल्या भागातील हॉल भाडेतत्वावर देता येऊ शकतो. सदर निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत किंवा 11 महिने यामध्ये जो कालावधी कमी असेल त्या कालावधीसाठी संबंधीतांना भाडेतत्वावर द्यावयाच्या रूममध्ये टाईल्स असल्यामुळे मॅट टाकणे, स्वतंत्र सबमीटर बसविण्यात येऊन विद्युत बील अदाईगी करणे, व्यायामाचे साहित्य स्वत/ आणणे, हॉल ताब्यात घेतल्यानंतर देखभाल दुरूस्तीचे काम स्वत: स्वखर्चाने करणे आणि प्रत्येक खेळाडुकडून कमाल रू.250/- प्रतिमाह फी घ्यावी या अटींवर एकत्रीत नाममात्र भाडे रू.5,000/- प्रतिमाह आकारणी करून भाडेतत्वावर देण्याच्या मान्यतेस्तव सादर.

श्री.राज वानखेडे : या ठरावामध्ये जे नाममात्र भाडे रू.5000/- दिलेले आहे, ते फक्त 240 चौ.मी. साठी दिलेले आहे. मागील स्थायी समितीमध्ये अशाचप्रकारचा ठराव होता, 600 चौ.मी. हॉलचा त्यास प्रतीमाह रू.1000/- प्रमाणे भाडेतत्वावर देण्यांत आले. माझ्या मते या व्यक्तीवर हा अन्याय आहे. आज आपण त्यास रू.5000/- भाडे आकारले इतर कर धरून रू.6000/- ते 7000/- होतील. ते पुन्हा भाडे भरणार नाही, त्यांचेकडे थकबाकी राहील, कोर्टात जातील, त्यापेक्षा नाममात्र भाडेतत्वावर देण्यांत यावे.

मा.सभापती : स.सदस्यांनी आताच प्रश्न उपस्थित केला, न्यु पावर व्यायाम व क्रिडा असोसिएशन औरंगाबाद यांना महानगरपालिकेच्या मालकीच्या नागरी क्रिडा केंद्र क्र.05, एन-2 कम्युनिटी सेंटर येथील हॉल रू.5000/- प्रतीमाह प्रमाणे भाडेतत्वावर देण्याचा प्रस्ताव प्रशासनातर्फे सादर झालेला आहे. त्यानुसार त्या हॉलचे भाडे कमीत कमी रू.1000/- प्रतीमाह घेण्यासंबंधी सूचना मी प्रशासनास करीत आहे. त्याचप्रमाणे सत्संग आश्रम गोविंदनगर, औरंगाबाद यांचा विनंती अर्ज स्थायी समितीकडे आलेला आहे. गोविंदनगर येथील प्लॉट क्र.1 समोरील खुली जागा क्षेत्र 799.5 चौ.मी. पैकी फक्त 200 चौ.मी. जागा ही 30 वर्षाच्या लीजवर वार्षिक रू.100/- प्रमाणे भाडेतत्वावर देण्यांत आली होती. परंतु त्यांचे भाडे जास्तीत जास्त घ्यावे, असा प्रस्ताव प्रशासनाने दिला होता, त्यानुसार त्यांनी कमीत कमी रू.1000/- प्रमाणे प्रतीमाह भाडे देण्यास समंती दिलेली आहे. त्यांची सुध्दा विनंती मान्य करण्यांत येते. प्रशासनास सूचना करण्यांत येते की, सत्संग आश्रम यांना रू.1000/- प्रतीमाह भाडे आकारण्यात येते, त्यासाठी पुढील आवश्यक कार्यवाही प्रशासनाने करावी. करीता विषय क्र.60 मंजूर करण्यांत येतो व सत्संग आश्रम, गोविंदनगर यांचीही विनंती मान्य करण्यांत येते, त्यासही मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या नागरी क्रिडा केंद्र क्र.05, एन-2 कम्युनिटी सेंटर येथील 12x20 या आकाराचा हॉल व्यायामशाळा सुरू करण्यासाठी अध्यक्ष, न्यु पावर व्यायाम व क्रिडा असोसिएशन औरंगाबाद यांना एन-2 कम्युनिटी सेंटर येथे दुरूस्तीचे काम चालू असल्याने पूर्ण दुरूस्ती होऊन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बराच

कालावधी लागणार असल्याने दरम्यानच्या काळात महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून सद्यस्थितीत दुरूस्तीचे काम पूर्ण झालेल्या भागातील हॉल भाडेतत्वावर निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत किंवा 11 महिने यामध्ये जो कालावधी कमी असेल त्या कालावधीसाठी संबंधीतांना भाडेतत्वावर द्यावयाच्या रूममध्ये टाईल्स असल्यामुळे मॅट टाकणे, स्वतंत्र सबमीटर बसविण्यात येऊन विद्युत बील अदाईगी करणे, व्यायामाचे साहित्य स्वत/ आणणे, हॉल ताब्यात घेतल्यानंतर देखभाल दुरूस्तीचे काम स्वतः स्वखर्चाने करणे आणि प्रत्येक खेळाडुकडून कमाल रू.250/- प्रतिमाह फी घ्यावी या अटींवर एकत्रीत नाममात्र भाडे रू.5,000/- प्रतिमाह ऐवजी रू. 1000/- प्रतीमाह प्रमाणे भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यांत येते. तसेच सत्संग आश्रम गोविंदनगर, औरंगाबाद यांचा विनंती अर्ज स्थायी समितीकडे आलेला असून, गोविंदनगर येथील प्लॉट क्र.1 समोरील खुली जागा क्षेत्र 799.5 चौ.मी. पैकी फक्त 200 चौ.मी. जागा ही 30 वर्षाच्या लीजवर वार्षिक रू.100/- प्रमाणे भाडेतत्वावर देण्यांत आलेली असल्याने परंतु त्यांचे भाडे जास्तीत जास्त घ्यावे, असा प्रस्ताव प्रशासनाने त्यांना दिल्यामुळे, त्यांनी कमीत कमी रू.1000/- प्रमाणे प्रतीमाह भाडे देण्यास समंती दिलेली असल्यामुळे, त्यांची विनंती मान्य करण्यांत येऊन सत्संग आश्रम,गोविंदनगर यांना रू.1000/- प्रतीमाह भाडे आकारण्यात येते, त्यासाठी पुढील आवश्यक कार्यवाही प्रशासनाने करणेसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 61 :</u>**

विषय : प्रभाग क्र.30 पवननगर येथील सेक्टर के-57 ते के-7 पवननगर आणि एन-09 के-शॉपींग सेंटर व एन -09 /एम-02 जैन मंदिर रस्त्यावर कॉंक्रीट रस्ता तयार करणे बाबत या कामाचे ठेकेदार मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन यांचेकडून 3.30% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.28,81,765/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र.-2016-AMCA-180462-6 सन 2016-17

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | उपअभियंता झोन क्र.04 |
| 2. | कामाचे स्वरुप | प्रभाग क्र.30 पवननगर येथील सेक्टर के-57 ते के-7 पवननगर आणि एन-09 के-शॉपींग सेंटर व एन-09/ एम-02 जैन मंदिर रस्त्यावर कॉंक्रीट रस्ता तयार करणे बाबत. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | र.रू.29,80,108/- मा.स्थायी समिती ठराव क्र.96 24/11/2016 |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.29,80,108/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | महा-ई-टेंडर |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 01 फेब्रुवारी 2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | चार |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | श्री.एन.पी.डिंडोरे | 3118684.05 | 4.65% जास्त दराने |
| 2 | मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन | 2881765.38 | 3.30% कमी दराने |
| 3 | रमेश बाळकृष्ण रूडसमुद्र | 2980108.98 | अंदाजपत्रकीय दराने |
| 4 | संतोष शिवरूपराव मोटेगावकर | 3068022.20 | 2.95% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | महानगरपालिका फंडातून |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |
| | तरी विषयाकिंत काम ठेकेदार मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन यानी 3.30% कमी दराने दाखल केली आहे. त्यानुसार ठेकेदार मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन यांनी 3.30% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.28,81,765/- पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/ कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.30 पवननगर येथील सेक्टर के-57 ते के-7 पवननगर आणि एन-09 के-शॉपींग सेंटर व एन -09 /एम-02 जैन मंदिर रस्त्यावर कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन यांचेकडून 3.30% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.28,81,765/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 62 :**

विषय : वार्ड क्र.3 अंतर्गत एकतानगर येथील विविध गल्ल्यांमध्ये जलवाहीन्या टाकणे.

संदर्भ : Tender ID-2017-AMCA-192689-5

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) |
| 2. | कामाचे स्वरुप | जलवाहीनी टाकणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | --- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रूपये 24,36,799/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | www.mahatenders.gov.in |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 05/05/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 12/05/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 01 |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | शेख कन्स्ट्रक्शन | 24,36,799.00 | 37% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | पाणी पुरवठा स्पील ओव्हन पान क्र.144, अ.क्र.4 |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | नाही |
| | तरी विषयाकिंत काम पाचव्या वेळेस प्राप्त निविदेतील सक्षम ठेकेदार श्री.शेख कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 48.48% जास्त दराची निविदा प्राप्त होती. वाटाघाटीअंती श्री.शेख कन्स्ट्रक्शन यांनी 37% जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविली आहे. तरी सक्षम ठेकेदार श्री.शेख कन्स्ट्रक्शन यांची 37% जास्त दराने म्हणजेच निविदा रक्कम रूपये 33,38,415/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.3 अंतर्गत एकतानगर येथील विविध गल्ल्यांमध्ये जलवाहीन्या टाकणे या कामासाठी पाचव्या वेळेस प्राप्त निविदेतील सक्षम ठेकेदार श्री.शेख कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 48.48% जास्त दराची निविदा प्राप्त झाल्यामुळे त्यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार श्री.शेख कन्स्ट्रक्शन यांचेकडून 37% जास्त दराने म्हणजेच निविदा रक्कम रूपये 33,38,415/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 63 :**

विषय : वार्ड क्र.101, फुलेनगर, एकनाथनगर, मिलिंदनगर येथील 40 ते 50 वर्ष जुन्या जीर्ण झालेल्या पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन बदलणे.

संदर्भ : Tender ID-2017-AMCA-190377-3

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) |
| 2. | कामाचे स्वरुप | जलवाहीनी टाकणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | --- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रूपये 19,85,218.00/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | www.mahatenders.gov.in |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 30/03/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 10/04/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 01 |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेद्राचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | श्री.सुरेश बी. साधवानी | 19,85,218.00 | 38% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | अर्थसंकल्प 2016-17 मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे. |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | नाही |
| | तरी विषयांकित काम पाचव्या वेळेस मागविलेल्या निविदेतील सक्षम ठेकेदार श्री.सुरेश बी. साधवानी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 38% जास्त दराची निविदा प्राप्त होती. वाटाघाटीअंती श्री.सुरेश बी. साधवानी यांनी 37% जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविली आहे. तरी सक्षम ठेकेदार श्री.सुरेश बी. साधवानी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 37% जास्त दराने म्हणजेच निविदा र.रू.27,19,749/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.101, फुलेनगर, एकनाथनगर, मिलिंदनगर येथील 40 ते 50 वर्ष जुन्या जीर्ण झालेल्या पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन बदलणेच्या कामासाठी पाचव्या वेळेस मागविलेल्या निविदेतील सक्षम ठेकेदार श्री.सुरेश बी. साधवानी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 38% जास्त दराची निविदा प्राप्त झाल्यामुळे त्यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार श्री.सुरेश बी.साधवानी यांचेकडून 37% जास्त दराने म्हणजेच निविदा र.रू.27,19,749/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 64 :**

विषय : वार्ड क्र.110 पोद्दार शाळा ते गादिया विहार शिवराज कॉलनी पर्यंतच्या रस्त्याचा व्हाईट टॉपींगद्वारे विकास करणे या कामाचे ठेकेदार एस.डी. दौंडे कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रू.1,19,65,667/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी. क्र.-AMCA-190788-15 सन 2016-2017

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता झोन क्र.1 ते 3 व 8 कार्यालय |
| 2. | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.110 पोद्दार शाळा ते गादियाविहार शिवराज कॉलनी पर्यंतच्या रस्त्याचा व्हाईट टॉपींगद्वारे विकास करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | 1,19,65,667/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 1,19,65,667/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | महा-ई-टेंडर |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 26/04/2017 ते 11/05/2017 पर्यंत |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 26/05/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | सदर कामासाठी चार वेळेस निविदा दर पत्रके मागविण्यात आले असता एकही निविदा दर पत्रक प्राप्त न झाल्यामुळे Close offer नुसार पात्र ठेकेदारा कडून दरपत्रके मागविण्यात आली असता एक निविदा दर पत्रक प्राप्त झालेले आहे. |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | एस.डी. दौंडे कन्स्ट्रक्शन | 1,19,65,667/- | अंदाजपत्रकीय दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते, शहर |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |
| | तरी विषयांकित प्रकरणी ठेकेदार एस.डी. दौंडे कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रू.1,19,65,667/- पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.110 पोद्दार शाळा ते गादिया विहार शिवराज कॉलनी पर्यंतच्या रस्त्याचा व्हाईट टॉपींगद्वारे विकास करणे या कामासाठी चार वेळेस निविदा दर पत्रके मागविण्यात आले असता एकही निविदा दर पत्रक प्राप्त न झाल्यामुळे Close offer नुसार पात्र ठेकेदारा कडून दर पत्रके मागविण्यात आली असता एक निविदा दर पत्रक प्राप्त झालेले असल्याने प्राप्त झालेल्या निविदाधारक ठेकेदार एस.डी. दौंडे कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रू.1,19,65,667/- पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 65 :**

विषय : वार्ड क्र.112 शिवाजीनगर मधील सेक्टर-सी मारूती मंदिरा पासून ते फोस्टर शाळे पर्यंतच्या विकास योजनेतील रस्त्याचे व्हाईट टॉपींगद्वारे विकास करणे या कामाचे ठेकेदार शेख माजिद शेख मोहम्मद यांचेकडून 4% जास्त दराने म्हणजेच टेंडर र.रू.75,55,679.04/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समिती/मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी. क्र.-AMCA-176283-4 सन 2016-2017

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता झोन क्र.4 ते 7 व 9 कार्यालय |
| 2. | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.112 शिवाजीनगर मधील सेक्टर-सी मारूती मंदिरा पासून ते फोस्टर शाळे पर्यंतच्या विकास योजनेतील रस्त्याचे व्हाईट टॉपींगद्वारे विकास करणे |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | 7483100/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 7265076/- |

| | | |
|---|---|---|
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | महा-ई-टेंडर / दिव्य मराठी |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 10/12/2016 ते 23/06/2017 पर्यंत |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 28/06/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | सदर कामासाठी चार वेळेस निविदा मागविण्यात आले असता एक निविदा प्राप्त झाली. |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | शेख माजिद शेख मोहम्मद | 7265076.00/- | 4 टक्के जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | विकास योजने अंतर्गत रस्ते मजबुतीकरण करणे व नविन डांबरी रस्ते. |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |
| | तरी विषयाकिंत प्रकरणी ठेकेदार शेख माजिद शेख मोहम्मद यांचेकडून 4% टक्के जास्त दराने म्हणजेच टेंडर र.रू.75,55,679.04/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/ कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.112 शिवाजीनगर मधील सेक्टर-सी मारूती मंदिरा पासून ते फोस्टर शाळे पर्यंतच्या विकास योजनेतील रस्त्याचे व्हाईट टॉपींगद्वारे विकास करणे या कामासाठी चार वेळेस निविदा मागविण्यात आल्या असता ठेकेदार शेख माजिद शेख मोहम्मद यांची एकच निविदा प्राप्त झालेली असल्याने त्यांचेकडून 4% जास्त दराने म्हणजेच टेंडर र.रू.75,55,679.04/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद